जा.क्र. पोआ/ २८८६ /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय,
दिनांक :- २१.०४.२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक २०/०४/२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २७.०४.२०२० चे २ ४.०० वा.चे दरम्यान संचारास मनाई व वाहतूक मनाई सुधारीत आदेश (हिंजवडी पोलीस ठाणे संपुर्ण क्षेत्र समाविष्ट करुन)**

**सुधारीत आदेश-**

२) ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात महाराष्ट्रात ,पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९ ) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. तसेच केंद्र सरकार आदेश नं.४०-३/२०२०-डीएम-१(ए) भारत सरकार, गृह मंत्रालय दि. १५/०४/२०२० अन्वये लॉकडाऊन आदेशाची मुदत ०३/०५/२०२० अखेर वाढवली आहे. या पार्श्वभुमीवर या कार्यालयाकडुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३) प्रमाणे **दिनांक १५/०४/२०२० चे ०० :०१ ते ३०/०४/२०२० चे २४ :०० या पर्यंत जमावबंदी आदेश जारी आहेत तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त क्षेत्रातील बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ झालेल्या काही भागात संचारास मनाई आदेश अंमलात आहेत**. तसेच महाराष्ट्र शासनाने संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १७/०४/२०२० अन्वये अधिसुचना जारी करुन लॉकडाऊन आदेशाची मुदत दिनांक ०३/०५/२०२० अखेर वाढविली आहे. आणि **संदर्भ केंद्रीय गृहविभाग आदेश क्र. ४०/३/२०२०-डीएम-१(ऐ) दि-१५/०४/२०२० व महाराष्ट्र शासन नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १७/०४/२०२० अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना पारीत केल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाकडील जा.क्र. पोआ/२८६३/२०२० दि. २१/०४/२०२० अन्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक १९/०४/२०२० चे ०० :०१ ते २७/०४/२०२० चे २४ :०० वा. पर्यंत जमावबंदी आदेश लागु करण्यात आले आहेत.**

३) ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरात कोरोना बाधित रुग्णांची संख्या चिंताजनकरित्या वाढत आहे. आणि शहराच्या काही भागात कोव्हीड - १९ चे क्लस्टर निर्माण झाले असून त्या परिसरात मोठया प्रमाणात रुग्ण संख्येत वाढ झालेली दिसत आहे. त्यामुळे कोव्हीड -१९ चा सामुदायिक प्रसार (Community Transmission) सुरु होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जिवीताला धोका निर्माण होण्याचा संभव निर्माण झाल्याने **आयुक्त पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांनी त्यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.अआ-१/कावि/६९/२०२० दि.१९/०४/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण भाग रविवार दि.१९/०४/२०२० रोजीचे रात्री १२.०० वाजले पासून पुढील आदेशापर्यंत कन्टेन्मेन्ट झोन** म्हणून घोषित केला आहे.

४) ज्याअर्थी महाराष्ट्र शासन संदर्भ नं. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक २१/०४/२०२० अन्वये राज्यात कोविड १९ चे कन्टेन्मेंटसाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना पारित करुन उपाययोजना जारी केल्या आहेत. **जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पुणे यांनी त्यांचे कार्यालयाकडील आदेश क्रमांक जिआव्य/कावि/५९८/२०२० पुणे दि. २०/०४/२०२० अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दितील पिंपरी चिंचवड महानगरपालिका संपुर्ण क्षेत्र (हिंजवडीसह) प्रतिबंधित क्षेत्र (containment zone) म्हणुन घोषीत केले आहे.**

५) ज्याअर्थी संदर्भ केंद्रीय गृह मंत्रालय आदेश नं.४०-३/२०२०-डीएम-१(ए)दि. १५/०४/२०२० व महाराष्ट्र शासन संदर्भ क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-०१ दिनांक १७/०४/२०२० अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. सदर महाराष्ट्र शासनाचे **सुधारीत मार्गदर्शक सूचनाच्या आदेशामधील परिच्छेद क्र. ३ व पोटवाक्य १ व २ मधील तरतुदीनुसार कन्टेन्मेन्ट झोन घोषित करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना देण्यात आले असून घोषित कन्टेन्मेन्ट क्षेत्रात संदर्भीय मार्गदर्शक सुचनानुसार दिलेल्या सवलती लागू होणार नाहीत. त्यानुसार सदर परिसरात कठोर परिमिती नियंत्रण ठेवणेबाबत आणि सदर भागामध्ये शासनाने दिलेल्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत तसेच**

**कोणत्याही व्यक्तीस तपासणी केल्याशिवाय सदर परिसरात येण्या-जाण्याची परवानगी न देणेबाबत निर्देश आहेत. (अपवाद - अत्यावश्यक सेवा, तात्काळ वैद्यकीय सेवा आणि कायदा व सुव्यवस्थेशी निगडीत कर्तव्य व शासकीय कामकाज.)**

६) ज्याअर्थी या पार्श्वभूमीवर सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रीया संहीता कलम १४४ मधील तरतुदीच्या अंतर्गत क्षेत्र प्रतिबंधक करणे, क्षेत्रातील नागरींकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे, क्षेत्रातून वाहनांचे अवागमन प्रतिबंधीत करणेसाठी स्थानिक निवासी अभ्यागत वारंवार कामानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाले असल्याने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील **<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी आदेश</u>** काढणे अत्यावश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे.

७) त्याअर्थी **मी संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४(१) (३) अन्वये <u>कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राच्या परिच्छेद - ७ मध्ये नमुद केलेल्या भागातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार करणे, वाहतुक करणे, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे, सर्व कृत्यास परिच्छेद ०६, ०७, व ०८ मधील तरतुदींच्या अधिन राहुन मनाई करणारा</u> **आदेश जा.क्र. २८६४/२०२०, दि.१९.०४.२०२० अन्वये, <u>दिनांक २०.०४.२०२० चे ००.०१ वा. ते दिनांक २७.०४.२०२० चे २४.०० वा</u>** चे दरम्यान लागू करण्यात आला आहे. सदर आदेशात सुधारणा करण्यात येत असुन क्षेत्रामध्ये हिंजवडी पोलीस ठाणेचे पुर्ण क्षेत्र समाविष्ट करण्यात येत आहे.

**८) खालील नमुद परिसरामध्ये नागरिकांना व वाहनांना प्रवेशबंदी तसेच परिसरातुन बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे.**

उपरोक्त मनाई आदेश पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी व हिंजवडी पोलीस ठाणेचे संपुर्ण क्षेत्रासाठी लागू राहील व तो १) हिंजवडी पोलीस ठाणे संपुर्ण क्षेत्र, २) वाकड, ३) सांगवी, ४) रावेत, ५) देहूरोड, ६) चिखली, ७) पिंपरी, ८) चिंचवड, ९) निगडी, १०) भोसरी, ११) एमआयडीसी भोसरी, १२) दिघी, पोलीस ठाणे हद्दीअंतर्गत येणा-या महानगरपालिका हद्दीतील कार्यक्षेत्रासाठी लागु राहील.

**९)सदर मनाई आदेशातून खालील प्रमाणे सवलतीचे निकष राहतील.**

**अ)** कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे, पोलीस विभागाचे व राज्य व केंद्रीय विभागांचे विनिर्दिष्ट कर्मचारी व वाहने तसेच त्यावश्यक सेवा देणा-या कर्मचारी व वाहनांना सदर च्या आदेशानुसार वगळण्यात येत आहे. तसेच अत्यावश्यक सेवा वस्तु यांचा पुरवठा करणारी मालवाहतुक सदरच्या आदेशातुन वगळण्यात येत आहे.

**ब)** उपरोक्त नमुद प्रतिबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या बँकिंग सुविधांसाठी सर्व बँकांनी शाखा कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०/०० ते १४/०० या वेळेत सुरु ठेवाव्यात तसच आपली एटीएम केंद्रे कार्यान्वीत ठेवावीत.

**क)** सदर काळात सकाळी १०.०० ते दुपारी ०२/०० या कालावधीतच दुध , भाजीपाला फळे विक्री सुरु राहतील. सदर विक्री मनपा मार्फत दिलेल्या आदेश क्र.मुजि/०२/कावि/२१०/२०२० दि.१५/०४/२०२० व मुजि/०२/कावि/२२५/२०२० दि.१७/०४/२०२० नुसार निश्चित केलेल्या जागांवरच अनुज्ञेय राहील. त्याव्यतीरिक्त उर्वरित कालावधी मध्ये विक्रीस प्रतिबंध राहील. घरपोच भाजीपाला व फळे विक्री ही मनपाच्या पुर्व मान्यतेनुसार अनुज्ञेय करण्यात येईल.

**ड)** सदर काळात मटण व चिकन यांची किरकोळ विक्री ही यापुर्वी मनपान दिलेल्या आदेश क्रमांक क्र.मुजि/०२/कावि/२२०/२०२० दिनांक १६/०४/२०२० नुसार सकाळी १०/० ते दुपारी ०२/०० या कालावधीतच सुरु राहील.

**इ)** सदर काळात अत्यावश्यक इतर सामान जसे अन्न धान्य जिवनावश्यक वस्तु यांची किरकोळ विक्री सुध्दा सकाळी १०/०० ते दुपारी ०२/०० या कालावधीतच सुरु राहील.

**फ)** प्रसार माध्यमाचे (सर्व प्रकारचे दैनिक, नियत कालिके, मासिके, टी.व्ही.न्युज चॅनल, इ.) कार्यालये चालु राहतील. प्रिंट मिडीयास सवलत देण्यात आलेली आहे परंतु कोविड १९ च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने वृत्तपत्रे व

नियतकालिकांच्या घरपोच डीलीवरीस मनाई आहे. परंतु वृत्तपत्रे व नियतकालीकांच्या अधिकृत परवानाप्राप्त दुकानातुन विक्री करण्यास सकाळी १०.०० ते दुपारी १४.०० वा.दरम्यान परवानगी राहील.

**ग) नागरीकांना प्रतिबंधीत क्षेत्रात दैनंदीन जिवनावश्यक वस्तु व सेवा उपरोक्त वर नमुद संदर्भीय आदेशाप्रमाणे सकाळी १०.०० ते दुपारी १४.०० वा.दरम्यान सुरु ठेवण्यास प्रशासनाकडून परवानगी देण्यात येईल. तशी सविस्तर उदघोषणा पीए सीस्टीमवरुन करण्यात येईल. दरम्यान मुदतीत सीआरपीसी कलम १४४(१)(३) प्रमाणे दि.१४.०४.२०२० रोजी पारीत केलेले आदेशाप्रमाणे दि.१५. ०४.२०२० रोजीचे ००.०१ ते दि.३०.०४.२०२० रोजीचे २४.०० वा.पर्यंत लागु केलेले जमावबंदी आदेश अंमलात राहतील.**

ह) घरपोच वाटप सकाळी ०८/०० ते रात्री १०/०० या कालावधीतच मनपाच्या पुर्व मान्यतेने पास घेवुन अनुज्ञेय राहील. मनपाच्या प्रभाग अधिका-याव्दारे निर्गमित करण्यात आलेला पास ग्राहय धरण्यात येईल.

ई) शहरातील सर्व इस्पितळे, दवाखाने व औषधी दुकाने संपुर्ण कालावधीकरिता खुली राहतील .

ज) अत्यावश्यक सेवांकरिता यापुर्वी पोलीसांमार्फत दिनांक ०३/०५/२०२० रोजीचे मर्यादेपर्यंत देण्यात आलेले पास दिलेल्या तारखे पर्यंतच लागु राहतील. नविन पास मनपामार्फत घेणे संबंधित आस्थापनांना बंधनकारक राहील. पास देण्यासंदर्भात पिंपरी चिंचवड मनपा मार्फत वेगळे आदेश निर्गमित करण्यात येतील.

ल) यापुर्वी मनपा मार्फत लागु करण्यात आलेल्या स्थानिक क्षेत्र कंन्टेन्मेंट झोन म्हणुन निश्चित करुन सिलबंद केलेचे आदेश  प्रभावित क्लस्टर म्हणुन पुर्वीप्रमाणेच लागु राहतील.

म) शासकीय कार्यालयांना आवश्यक कर्मचा-यांसाठी आवश्यक पास मनपा मार्फत उपलब्ध करुन दिले जातील. याकरिता संबंधित आस्थापनेचे विभाग प्रमुख शासनाचे निर्देशाप्रमाणे आवश्यक कर्मचा-यांची सुची प्रमाणित करुन मनपा कार्यालयास सादर करतील.

न)मोशी कृषी उत्पन्न बाजार समिती बाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी पारित केलेले आदेश कायम लागु राहतील. बाजार समितीतील व्यवहारांना सदरच्या आदेशामधुन वगळण्यात येत आहे.

व) कन्टेन्मेंट झोनमधील कर्मचा-यांच्या संचारावर नियंत्रण आणण्यासाठी कर्तव्यावरील हजर अधिकारी व कर्मचारी हे शक्यतो त्याच क्षेत्रास वास्तव्यास असावे. तसेच अशा व्यक्तींची त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी वास्तव्याची सुविधा संबंधित आस्थापनांनी उपलब्ध करुन दयावी.

१०) परिच्छेद क्रमांक ५ व ६ मध्ये नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे.**(उदा- मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

११) सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा  १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१२) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०४.२०२० रोजी दिलेला आहे.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण** :- पिंपरी चिंचवड
**दिनांक** :- २१.०४.२०२०